जर तुम्हाला खरोखर गरीबांना मदत करावी असं वाटत असेल तर आधी तुम्ही देण्यायोग्य बना, सधन बना आणि मग इतरांनाही सधन बनण्यासाठी त्यांची मदत करा.



हे पुस्तक तुम्हाला श्रीमंतीचे रहस्य अगदी विस्तांराने समजावून सांगेल. मला खात्री आहे की या विषयी अधिक काही वाचण्याची आता तुम्हाला कधीच गरज पडणार नाही.

**International Best Seller**

# श्रीमंतीचे गुपित

(द सायन्स ऑफ गेटिंग रिच चा मराठी अनुवाद)

**1910** मध्ये लिहिलेलं हे पुस्तक तुमचं जीवन बदलून टाकेल.

लेखक
वैलेस डेलोएस वेट्टल्स

**क्यूफोर्ड, भारत**

# तुमचा निर्णय हा तर तुमचा अधिकार!




प्रकाश वाटल्याने दिव्याचा उजेड कमी होत नाही

मदर तेरेसा

संशय अडथळे पाहतो, विश्वास मार्ग शोधतो
संशय काळोख पाहतो, विश्वास प्रकाशाकडे नेतो
संशय थांबवतो, विश्वास पुढे घेवून जातो
संशय प्रश्न विचारतो, विश्वास उत्तर देतो.

रिच दे वॉस

# अनुक्रमांक


परिचय

मनोगत

| | | |
|---|---|---|
| 1. | श्रीमंत व्हा | 11 |
| 2. | श्रीमंतीचे शास्त्र | 15 |
| 3. | समान संधी | 19 |
| 4. | पहिला नियम | 23 |
| 5. | जीवन विस्तार | 29 |
| 6. | लक्ष्मी आपल्या दारी | 35 |
| 7. | कृतज्ञता | 41 |
| 8. | निश्चित विचार दिशा | 45 |
| 9. | इच्छाशक्तिचा सदुपयोग | 51 |
| 10. | सफलतेचे बीजारोपन | 57 |
| 11. | प्रयत्नाची योग्यदिशा | 61 |
| 12. | कुशल प्रयत्न | 67 |
| 13. | योग्य कार्याचा शोध | 71 |
| 14. | मुबलकतेची अभिलाषा | 75 |
| 15. | प्रगति पुरूष | 79 |
| 16. | निष्कर्ष आणि सावधानता | 83 |


तुम्ही मागितलं तर तुम्हाला नक्कीच दिल्या जाईल पण जे संतुष्ट असतील त्यांच्या कडून परत घेतल्या जाईल.

बायबल

# परिचय

मागच्या एका शतकाहून अधिक काळापासून हजारो लाखो लोकांच्या जीवनात प्रेरणास्त्रोत ठरलेल्या जगातील सर्वाधिक खपाचे ''दि सायन्स ऑफ गेटिंग रीच'' चे लेखक श्री वैलेस डेलोएस वेट्टल्स (1860-1911) जगाला सुपरिचित आहेत. मात्र तरिही लोकांना ते अमेरिकेत जन्मले या शिवाय त्यांचा अधिक काही भूतकाळ कुणाला ठावूक नाही. वास्तविक त्यांचा प्रारंभीचा काळ फार दु:खद होता. अभाव आणि अनुपलब्धता, गरीबी, नैराश्य या बाबीनी त्यांचा जणू काही पाठपुरावाच केला होता.

शेवटी वेट्टल्स ने प्राप्त परिस्थिती बदलण्याचे ठरवलं. त्यांच्याच शब्दात सांगायच तर , ''जर तुम्ही सधन, यशस्वी आणि निरोगी बनण्याचा निर्णय घेतला नसेल तर त्याचा एकमेव अर्थ असा की, तुम्ही स्वत:च गरीब, अयशस्वी आणि रोगीट बनायचा निर्णय घेतला आहे.'' यशस्विता ही वेट्टल्स यांची प्राथमिकता होती. ''त्यांचा अधिकाधिक वेळ लिखानात व्यतित होत असे. एक यशस्वी लेखक, शक्तिशाली आणि प्रगती मार्गावरील एक प्रवासी बनणे हेच एकमेव त्याचं स्वप्न होतं जे साकार करण्यासाठी, त्या स्वप्नाला वास्तवात रूपांतरित करण्यासाठी त्यांनी अथक परिश्रम केले. या पुस्तकाचं प्रत्येक पान त्यांच्या जीवनानुभवाची कथा आहे. वास्तविक ते स्वत: एका प्रचंड शक्तीचे केंद्र होते.'' असं त्यांची कन्या फ्लोरेन्सचं मत आहे. डेस्कर्ट्स, इमर्सन, हेगेल, लेबनित्झ, शोपेन हौर आणि पिनोजा अशा महान व्यक्ती वेट्टल्स यांच्या प्रेरणा स्थान होत्या.

सततची अध्ययन वृत्ती आणि कठीण परिश्रमाव्दारे त्यानी संपत्ति, स्वास्थ्य आणि यश तर मिळवलच पण त्यांच स्वत:च असं एक नवं तत्वज्ञानचं जन्माला घातलं ज्यामुळे त्यांच्या स्वत:च्या जीवनात अमुलाग्र

परिवर्तन घडून आलं.

इ.स. 1910 मधे या पुस्तकाच्या प्रकाशनानंतर श्री वेट्टल्स यांच देहावसान झालं परंतु त्यांच हे ऐतिहासिक लेखन आजही पृथ्वीतलावरील लाखो अभावग्रस्त, दीन माणसांना प्रेरणास्त्रोत बणून श्रीमंतीचा सधनतेचा राजमार्ग दाखवत आहे.

"तुम्ही करीत असलेली प्रतीक्षा एखादया पर्वताची उंची कमी करणार नाही"

"योग्य मार्गावर का होईना, तुम्हाला धावावं तर लागेलच."

विल रोजर्स

# मनोगत

हे पुस्तक कुणावर टीका करण्यासाठी अथवा तुम्हाला एखाद नंव तत्वज्ञान शिकवण्यासाठी नक्कीच लिहिलेलं नाही. हे एक संपूर्णतः व्यावहारिक पुस्तक आहे, जे श्रीमंत किंवा सधन होवू इच्छिणाऱ्या प्रत्येक स्त्री अथवा पुरुषासाठी उपयोगी ठरेल. हे पुस्तक त्या प्रत्येकासाठी आहे जो क्रिया-प्रतिक्रियेच्या सिध्दांताला जाणून घेवू इच्छितो.

आपल्याकडून एकच अपेक्षा आहे की, तुम्ही या पुस्तकात मांडलेल्या सिध्दांतावर निशंक मनाने अंमल करावा, जसा मार्कोनी अन् एडिसन च्या सिध्दांतावर केला जातो. माझी खात्री आहे की जो कुणी स्त्री किंवा पुरुष या पुस्तकातील सिध्दांताचे पालन करेल तो निश्चितच थोडयाच कालावधीत श्रीमंत होवून जाईल. कारण हा नियम विज्ञानाधिष्ठित आहे. आणि त्यामुळे तुमचं असफल होणं हे अशक्य आहे.

या पुस्तकात साधी सरळ स्पष्ट भाषेचा उपयोग करण्यात आला आहे, कारण प्रत्येकाला या पुस्तकातला शब्द न शब्द कळायला हवा आहे. या पुस्तकातला प्रत्येक शब्द अन् सिध्दांत अनेक वर्षांच्या प्रयोगाचे फलित आहे. तुम्हीही यातील नियमाचे पालन करा अन् श्रीमंत व्हा ...

आपला शुभेच्छुक

वैलेस डेलोएस वेट्टल्स

प्रकरण : 1

# श्रीमंत व्हा

दारिद्र्याचे भले कुणी कितीही समर्थन करु दया पण श्रीमंती शिवाय जीवन पूर्णपणे, मनभरुन, मुक्तपणे जगता येणे अशक्य आहे हे कुणी नाकारुच शकत नाही. अभावाच्या गर्तेत प्रतिभा कुंठित होते अन् आत्मविकासाच्या मार्गात हे दारिद्र्य अडथळा बनून जाते. यात दुमत असण्याचे काहीएक कारण नाही. कारण आत्मविकास आणि प्रतिभेला नवे घुमारे फुटण्यासाठी अनेक प्रकारच्या साधनाची आवश्यकता असते, अन् धन संपत्ती शिवाय साधनाची परिपूर्ती होवू शकत नाही.

जागतिकीकरणाच्या आजच्या युगात साधनांचा उपयोग माणूस मानसिक, आत्मिक तसेच शारीरिक विकासासाठी करीत असतो. मग अर्थव्यवस्थेला प्राधान्य देणाऱ्या आजच्या काळात आम्हाला मागे राहून कसे चालेल? आणि म्हणूनच आजच्या या युगात आम्हाला धनवान होण्याचं हे शास्त्र समजावून घ्यावचं लागणार आहे.

विकास अन् अखंड विकास हेच मानवी जीवनाच एकमेव ध्येय आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचं तर प्रगतीला आपलं योगदान देणं हे आपलं प्रथम कर्तव्य अन् अधिकार आहे.

सर्वप्रथम तुम्ही कोणतीही गोष्ट प्राप्त करण्यासाठी येणाऱ्या अडथळयाला (पैसा,धन) दूर करा. तरच मानसिक, अध्यात्मिक आणि भौतिक विकासाच्या दिशेने मार्गक्रमण करण्यासाठी माणूस तन - मनाने तयार होतो. अर्थात प्रचंड धन संपत्ती मिळवणे किंवा ती मिळवण्याच्या अडथळयापासून मुक्ती मिळवण्यालाच तुमच्या प्रगतीचा शुभारंभ मानावा लागेल.

श्रीमंतीचा उद्‌देश आहे त्यात समाधान मानणे किंवा अल्पसंतुष्ट

वृत्तीला जन्म देणे असूच शकत नाही. जर तुमच्यात मुबलक यश मिळवण्याची क्षमता असेल तर मग आहे त्यात समाधान तरी का मानायचं ? निसर्ग सुध्दा प्रगती, प्रसार अन् विकासाला प्राधान्य देतो. म्हणजेच या कार्यात आपला वाटा देणं हाच आपला धर्म आहे. स्वाभाविकच अल्प संतुष्ट असल्यासारखं दुसरे पाप नाही. संपूर्ण आणि संपन्नतेनं परिणूर्ण जीवन जगण्यासाठी जे आणि जितकं आपणास हवं आहे ते सर्व तुमच्याजवळ असेलं तरच तुम्ही श्रीमंत आहात, आणि या संपूर्ण जगात असा एकही माणूस नाही की जो हे सर्व मिळवण्यासाठी असमर्थ आहे. आजच्या या युगात विकासाच्या आंधळ्या वाटेवर धावता धावता माणंसाच जगणंच हरवून चाललयं जीवन क्लिष्ट होवून गेलय, आणि म्हणूनच जीवन संपूर्णपणे अन् चांगल्या पध्द्तीने जगायचं असेल तर आपल्या जवळ धन संपतीची अत्यंत आवश्यकता भासते. कारण प्रत्येक जण आपली स्वप्ने साकार करण्यासाठी धडपडत असतो. पण ही स्वप्नं साधना शिवाय कशी पूर्ण करणार ? आणि म्हणूनच ही साधन सामुग्री मिळवायची असेल तर तुम्ही आर्थिक दृष्टया स्वतंत्र असणे गरजेचे आहे. या पुस्तकाचा सार समजून घ्यायचा असेल तर मनाचे अन् बुध्दीचे सारे कवाडं उघडून या बाबी समजून घेणं आवश्यक आहे.

श्रीमंतीची इच्छा असणं ही काही वाईट बाब नाही. कारण त्या इच्छेमागे धनसंपत्ती, विकास, सपूंर्णता आणि मुबलकतेची भावना असते, जी अंत्यत नैसंर्गिक आहे. त्यामुळे जो व्यक्ती आपलं जीवन चांगल्या पध्दतीने अन् संपूर्णपणाने जगण्याची इच्छा बाळगत नसेल अशी व्यक्ती विरळीच म्हणावी लागेल त्याच प्रमाणे धन प्राप्तीसाठी जे काही परिश्रम घ्यावे लागतात त्या पासून दूर राहणारा माणूसही असाधारणच मानावा लागेल.

संपूर्ण मानवी समूह तीन गोष्टी साठी जगत असतो, त्या तीन गोष्टी म्हणजे शरीर, बुध्दी अन् आत्मा होय या तिन्हीपैकी कोणतीही एक गोष्ट अधिक महत्वपूर्ण किंवा विशेष अथवा पवित्र नसते तर या तिन्ही बाबीचे मानवी जीवनात सारखेच महत्व असते. कारण या तिनही गोष्टींना त्याचं एक विशेष महत्व आहे. या पैकी कुठल्यातरी एकाच गोष्टीवर भर देवून आपण जगू शकत नाही. आज दुर्दैवाने लोक फक्त शरीराला महत्व देताना दिसतात, फक्त शरीरासाठी जगताना दिसून येतात. "शरीर सांभाळले, ते चांगले राहिले तरच आपण जीवनाचा खऱ्या अर्थाने आस्वाद घेवू शकातो"

असं ते या देहकेंद्रित जगण्याचं समर्थन करीत असतात. पण त्यांच हेच विधान बुध्दी अन् आत्म्याच्या संदर्भातही तेवढेच लागू पडते हे मात्र ते विसरतात. शरीर, बुध्दी अन् आत्मा हे अभावग्रस्त वातावरणात केवळ असंतोषच जन्माला घालू शकतात आणि कोणतीही अधुरी इच्छा सतत पूर्ततिचा, परिपूर्णतिचा मार्ग शोधत असते.

आपल्या शरीराला अन्न, वस्त्र, निवाऱ्यासोबतच एक आंनदाचं झाड हवं असतं. म्हणजेच त्याला शरीर श्रमापासून मुक्ती हवी असते, शारीरिक अन् मानसिक विश्रांती हवी असते. मनोरंजनाची आवश्यकता असते. त्यासाठी चांगली पुस्तकं वाचणं, हिंडणं फिरणं, निसर्गाच्या सानिध्यात जावून निसर्गानुभव घेण, चांगल्या, बुध्दीवंत मित्राच्या सहवासात राहणं या सरख्या बाबी सोबतच बौध्दिक कसरती, गीत संगीत, नाटक, कला आणि सौंदर्याची आवड असणं तसेच आपण करीत असलेल्या कामाचं कुणीतरी कौतुक करणं या बाबी सुध्दा मन:स्वास्थ्य राखतात, मन आणि बुध्दीची सकारात्मकता टिकवून ठेवण्यासाठी उपयोगी ठरतात.

प्रेम आत्म्याचा आहार अन् दरिद्रय प्रेमभिव्यक्तीतील अडथळा मानल्या जातात. ज्यांच्यावर आपण मनापासून प्रेम करतो त्यांच्यासाठी काहीतरी करण्यामुळे आपणास मनस्वी आनंद मिळतो, कारण समर्पण हा प्रेमाचा स्वभाव धर्मच आहे. पण जर एखादयाकडे देण्यासारख काहीच नसेल तर असा व्यक्ती एक चांगला जोडीदार, चांगला पालक, एक चांगला नागरिक किंवा चांगला माणूस तरी कसा बनू शकेल ? आपण आपल्या देहाला सुखी ठेवण्यासाठी विविध भौतिक वस्तूंचा वापर करतो ज्यामुळे आत्मा आणि बुध्दीचा विकासही परस्परपूरक न्यायाने होत असतो. त्या मुळेच सधन होण्याला प्राधान्यक्रम देणे गरजेचे होवून जाते.

सर्वप्रथम तुमच्यात श्रीमंत बनण्याची इच्छा असली पाहिजे. मग संपूर्ण एकाग्रतेने त्या इच्छापूर्तीसाठी पूरक असलेल्या शास्त्राचा अभ्यास केला पाहिजे. पण जर तुम्ही हे करत नसाल तर तुम्ही तुमच्या कर्तव्यापासून दूर जात आहात असं खुशाल समजा. एक गोष्ट कायम लक्षात राहू दया, ती म्हणजे जर तुम्ही श्रीमंत झालात तर ती तुमच्याकडून मानवतेला अन् ईश्वराला दिलेली सर्वश्रेष्ठ भेट असेल.

## प्रकरण : 2

# श्रीमंतीचे शास्त्र

गणित अन् भौतिक शास्त्राच्या नियमा सारखेच श्रीमंतीचे ही काही विशिष्ट नियम आहेत. आणि ते कसोटीवर घासून सिध्द झालेले आहेत. जगातला कोणताही माणूस या नियामाचे पालन करुन धन संपन्न होवू शकतो.

एका विशिष्ट कार्यपध्दती नुसार सतत प्रयत्नरत राहिल्यास धन प्राप्ती अवश्य होते. जे लोक कळत नकळत या पध्दतीचा अवलंब करतात ते धनवान होवून जातात. अन् जगात असेही काही दुर्देवी लोक आहेत जे कठीणातील कठीण परिश्रम करुनही रंकच राहतात.

क्रिया - प्रतिक्रिया (Action-Reaction) या नियमा सारखाच हा सुध्दा एक अचूक नियम आहे. त्यामुळे जो कुणी स्त्री अथवा पुरुष या नियमाचे पालन करील तो सधन झाल्या शिवाय राहणार नाही.

श्रीमंत किंवा सधनता ही काही वातावरणाशी संबधित बाब नाही. जर तसचं असतं तर एका विशिष्ट वातावरणातले सर्वच लोक श्रीमंत झाले असते, किंवा एखादया विशिष्ट शहरातले, भूप्रदेशातले, एखादया विशिष्ट देशातले सारेच रहिवासी धन संपन्न अन् इतर ठिकाणचे नागरिक गरीब झाले असते.

परंतु आपण लक्षपूर्वक बघितलं तर आपल्या असं ध्यानात येतं की श्रीमंत अन् गरीब एकाच वातावरणात, एकाच व्यवसायात काम करताना दिसतात. एकाच ठिकाणच्या या दोन व्यक्ती समान व्यवसायात असून सुध्दा राव आणि रंक असतात याचा अर्थ इतकाच की गरीबी किंवा श्रीमती ही वातावरणांशी सबंधित नसते. मात्र काही विशिष्ट परिस्थिती अनुकूल अथवा प्रतिकूल असू शकते, परंतु तरीही एक समान वातावरण आणि

समान व्यवसायातीलही काही लोक यशस्वी तर काही अयशस्वी होतातच म्हणजेच आपण या निष्कर्षांपर्यंत पोहचतो की, यशस्विता किंवा श्रीमंती ही एका विशिष्ट अशा कार्यपध्दतीचा परिणाम असते. परंतु याचा अर्थ असा नाही की या कार्य पध्दतीवर कुणाचा मालकी हक्क आहे. किंवा या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यासाठी तुमच्यात काही विशेष योग्यता पाहिजे. याचं साध सरळ कारण असं की, काही विशेष योग्यता असणारे बुध्दीवंत इतराची चाकरी करताना आपण पाहतच असतो. याचाच अर्थ या पृथ्वीतलावरचा प्रत्येक नागरिक धन संपन्न होवू शकतो.

जगातल्या अनेक धनसंपन्न लोकांच्या एका सर्वेक्षणात असे लक्षात आले की, त्यांच्यात इतरां सारख्यांच योग्यता असतात. काही वेगळया क्षमता, प्रतिभा किंवा काही विशेष बुध्दीप्रविण्य नसतं, पण मग तरीही ते धनवान अन् इतर रंक का? या प्रश्नाचं साधं सरळ उत्तर असे की, त्यांची कार्य पध्दती अंत्यत वेगळी असते.

श्रीमंती ही कंजुषी किंवा धन संग्रहाचा परिणाम नसतो कारण अनेक धन संपन्न व्यक्ती सढळ हस्ते खर्च करतांना आढळून येतात. या उलट कंजुषी अन् बचतीचा मार्ग गरीबांनाच अधिक शोभून दिसतो. असेही नाही की, श्रीमंत व्यक्ती इतर लोक जे काही करण्यात असफल ठरले आहेत त्या गोष्टी लिलया करतात म्हणून ते श्रीमंत होतात. कारण समान व्यवसायातील समान कृती करणाऱ्या लोकापैकींही काही सफल तर काही निष्फळ झालेले आढळतात.

वरील सर्व विश्लेषणातून असा निष्कर्ष निघतो की, धन संपन्न होण्यासाठी एका निश्चित कार्य पध्दतीचा अवलंब करणे अत्यावश्यक आहे. आणि ही बाब जर सत्य असेल तर क्रिया - प्रतिक्रिया नियमासम श्रीमंतीचा नियम सुध्दा लिपीबध्द केल्या जावू शकतो, जो आपण शिकू शकतो. अन् त्याचं पालन करून जगातील कोणीही स्त्री पुरुष धनवान होवू शकतो. ज्याला आपण संपन्नतेची व्याख्या असं नामाभिदान करू शकतो.

जगातल्या एकूण लोकसंख्येपैकी फारच कमी लोक धन संपन्न अन् बाकीचे गरीब आहेत. या सत्याकडे पाहिल्यास श्रीमंतीचा मार्ग कठीण तर नाही ना? असा प्रश्न नक्कीच पडतो. पण आतांपर्यंत आपण जे विश्लेषण अभ्यासलं आहे त्यानुसार श्रीमंतीचा मार्ग बिलकूल कठीण नाही. कारण निसर्गाने श्रीमंत बनन्यासाठी आवश्यक असलेले सर्व गुण माणसाला

जन्मतःच दिलेले आहेत, म्हणूनच तर बुध्दीवंत, प्रतिभासंपन्न, मुर्ख, स्वस्थ, अस्वस्थ, बलशाली अन् दुर्बल असे सर्वच प्रकारचे लोक धन संपन्न झालेले दिसून येतात.

जो आपल्या श्रवणेंद्रियांनी ऐकू शकतो, त्यावर विचार करू शकतो अन् ती गोष्ट समजून घेवू शकतो असा प्रत्येक माणूस माझं म्हणनं समजून घेवू शकतो आणि निश्चितपणे धनवान होवू शकतो.

आतांपर्यंत आपण हे जाणून घेतलं की, श्रीमंती ही वातावरणाशी संबधित नाही. परंतु अशी काही अपवादात्मक स्थळं आहेत की तेथे हा नियम लागू होत नाही. उदा. सहारा वाळवंट

श्रीमंतीच्या मार्गाने प्रवास करायचा असेल तर लोकव्यवहार कसा आहे ते आपणास तपासून घ्यावे लागेल. ग्राहकांची अभिरूची जाणून घेणं ही सुध्दा एक कला आहे. पण ही बाब सुध्दा भाषा, परिस्थिती आणि स्थळानुसार बदलून जाते. माझं म्हणणं इतकच की, जर तुमच्या शहरात एक जरी माणूस श्रीमंत होवू शकत असेल तर मग तो माणूस तुम्हीच का असू नये?

मी पुन्हा आपणास सांगू इच्छितो की, धनसंपन्न होण्यासाठी काही विशेष व्यवसाय अथवा धंदा निवडण्याची आवश्यकता नाही आहे. सर्वच प्रकारच्या व्यवसायात लोक यशस्वी होताहेत. आणि यात आश्चर्यकारक असं काहीच नाही की समान व्यवसायात असूनही आपला किंवा आपला सहव्यवसायिक एकमेकापेक्षा अधिक यशस्वी असतो.

ज्या व्यवसायात तुम्हाला आवड असेल तोच व्यवसाय जर तुम्ही निवडलात तरच तुम्ही त्यात सर्वस्व ओतू शकाल. तसेच योग्य पध्दतीने विकसित केले गेलेले गुण (प्रतिभा) तुमच्या यशाची खात्री बनतात. भौगोलिक वातावरणानुसार व्यवसायाची निवड करा. आईस्क्रीम चा व्यवसाय करावयाच असेल तर हिमालयात जावून उपयोग होणार नाही, त्या ऐवजी वाळवंटी उष्ण प्रदेशाची निवड करावी लागेल. मत्स्योद्योगासाठी फ्लोरिडा ऐवजी अमेरिकेचा उत्तर - पश्चिम भूभाग अधिक उपयोगी ठरेल इ.

तुमचं यश हे कुठल्याही एखादया विशिष्ट व्यवसायावर अवलंबून नाही. एका समान व्यवसायात तुमच्या ऐवजी दुसरा अधिक यशस्वी असेल तर याचा सरळ अर्थ असा की, आपल्या दोघांच्या कार्यपध्दतीमधे फरक आहे. म्हणजेच तुम्हाला जर धनवान व्हायचं असेल तर तुम्हाला एका विशिष्ट आणि निश्चित अशा कार्यपध्दतीचा अवलंब करावा लागेल, नशिबाला दोष

देण्यापेक्षा तुमच्या यशस्वी स्पर्धक व्यावसायिकाचं अनुकरण करावं लागेल.

संपत्तीचा अभाव कुणाच्या धनसंपन्न होण्यासाठी अडथळा ठरू शकत नाही. जर तुमच्याकडे भरपूर धनसंपत्ती असेल तर मग तुम्हाला धनसंपन्न होण्या विषयी चिंता करण्याचे काही एक कारण नाही. परंतु जर तुम्ही अभावग्रस्त असाल, धनसंपत्ती हीन असाल आणि तुम्ही हे श्रीमंतीचे शास्त्र अवलंबत असाल तर थोडयाच काळात तुम्ही श्रीमंतीच्या दिशेने प्रवास करू लागाल. तुमच्याकडे हळूहळू पैसा येवू लागला की, तुम्ही श्रीमंत होवू लागला आहात असं खुशाल समजा. तुम्ही या श्रीमंतीच्या शास्त्राचे योग्य पध्दतीने पालन करीत आहात असाही त्याचा अर्थ होतो.

समजा तुम्ही पृथ्वीतलावरील अत्यंत गरीब अन् निर्धन व्यक्ती आहात. तुम्ही खूप कर्जबाजारी झालेले आहात आणि तुमचा एकही मित्र तुमच्या सोबत राहिला नाही, तुम्हाला साधन सामुग्रीची अत्यंत कमतरता भासते आहे. तुम्ही जगातले अगदीच प्रभावशुन्य व्यक्तिमत्वाचे धनी असला तरीही काही एक काळजी करू नका. कारण तुम्ही या श्रीमंतीच्या शास्त्राचं पालन करू लागलात की, क्रिया - प्रतिक्रियेच्या नियमानुसार तुम्ही सधन होणार हे निश्चित समजा. तुमच्या जवळ अगदी एक छ्दामही नसला तरीही तुम्ही धनवान होवू शकता. कदाचित तुम्ही चुकीच्या व्यवसायात असाल तर तुम्ही तुमच्या आवडी प्रमाणे नवा व्यवसाय निवडू शकता, तुम्ही चुकीच्या ठिकाणी असाल तर तुम्ही तुमचे ठिकाण बदलू शकता आणि हे सगळं तुम्ही वर्तमान परिस्थितीत किंवा वातावरणात आणि वर्तमान व्यवसायात राहूनही श्रीमंतीच्या शास्त्राच्या नियमाचं पालन करून करू शकता. ज्याची परिणिती शंभर टक्के यशातच होते.

चला तर मग, या नैसर्गिक नियमाचं पालन करू या !

प्रकरण : 3

# समान संधी

संपन्नता ही कुणा एकाची खाजगी मालमत्ता नाहीए. कुणीही तुम्हाला धनवान होण्या पासून रोखू शकत नाही अन् तुमच्या भाग्यात धनयोग नाही असेही नाही. जर तुम्हाला वाटत असेल की तुम्ही सध्या ज्या प्रदेशात राहत आहात तेथे व्यावसायिक यश मिळण्याची शक्यता नाही तर अशा वेळी नव्या यशोशिखराच्या वाटा शोधणे गरजेचे ठरते.

जगातील प्रत्येकालाच मुबलक प्रमाणात समान संधी मिळत असते. आणि ही संधी सामाजिक विकासात वेळोवेळी आपला योगदान देत असते. मात्र या संधीचा लाभ उठवायचा असेल तर या संधीच्या प्रवाहाच्या विरोधात जाण्यापेक्षा मिळालेल्या संधीसह प्रवास करणे उचित ठरते.

निसर्ग कुणालाही संधी विना वंचित ठेवत नाही. राजा असो वा रंक, श्रीमंत असो वा गरीब, नोकर असो अथवा मालक, निसर्ग प्रत्येकालाच समान संधी बहाल करतो. मालकाद्वारे नोकराचं शोषण करून अथवा मोठ्या व्यवसायाद्वारे छोट्या व्यावयायिकांना परिस्थितीच्या वरवंट्याखाली रगडून गरीब बनवल्या जावू शकत नाही. कारण निर्धन व्यक्तीची, गरीबांची कार्यपध्दती आणि विचार प्रणाली श्रीमंतीच्या विज्ञानाच्या विरोधात असते.

श्रीमंतीच्या विज्ञानांची कास धरली तर गुलाम आपल्या दास्यत्वातून मुक्त होवून मालकाच्या रांगेत येवून बसू शकतात. कारण हे श्रीमंतीचे नियम त्याचं पालन करणाऱ्या प्रत्येकाला सारखीच फळं देतात. मात्र तुम्ही या नियमांना समजून उमजून त्याचं पालन मात्र करायला हवं. जे लोक असे करणार नाहीत परमेश्वराच्या राज्यात ते निश्चितपणे रंकच राहतील एवढे मात्र नक्की. जे लोक श्रीमंत बनू इच्छितात परंतु आजपावेतो या श्रीमंतीच्या

नियमांच्या बाबतीत अनभिज्ञ होते त्यांच्या साठी हे पुस्तक आणि यातील नियम श्रीमंत बनण्याच्या दृष्टीने वरदान ठरेल.

अभाव हे निर्धनतेचे कारण नाही. निसर्गाच्या कुशीत तुमच्या गरजांपेक्षा कैक पटीने अधिक संपदा दडून पडलीय. जगातल्या प्रत्येकालाच एक भव्य प्रासाद बनवून देता येईल, सर्वांना महागडी वस्त्र अन् उदरभरणा साठी स्वादिष्ट भोजनाची ही व्यवस्था होवू शकेल इतकी सामुग्री एका छोटयाशा राज्यातच उपलब्ध आहे. कारण ही नैसर्गिक संपत्ती निसर्गाएवढीच विशाल आणि अनंत आहे.

पृथ्वीतलावर आपण जे काही दृष्यरुपात पाहत असतो त्या प्रत्येकाची निर्मिती एका 'मूल कणा' पासून झालेली असते, या मुलतत्वा पासूनच प्रत्येक वस्तूची रचना केली जाते. त्यातूनच नव्या अवस्थेला आणि नव्या रूपाला जन्मदिल्या जातो आणि जुन्याला मिटवलं जातं. या विश्वातल्या प्रत्येक सृजनामागे इश्वराची एक योजना असते, एक कार्यपध्दती असते. त्यामागे एक कल्पना कार्य करीत असते. अगदी पृथ्वीची रचना सुध्दा याच मूलतत्वा पासून झालेली आहे. या ब्रम्हांडातील सर्वच ग्रह, तारे, चंद्र, सूर्य, आकाश, प्रकाश, जल, वायू, उपग्रह इ. इ. सगळयाच दृष्य अदृष्य गोष्टी आणि अवस्थांचा जन्म सुध्दा याच तत्वापासून झाला आहे आणि इतकं सारं होवूनही यातला एक अंश सुध्दा नष्ट झाला नाही, संपला नाही.

कुणाच्याही दारिद्रयाला निसर्ग जबाबदार असू शकत नाही. उलट निसर्ग मानवाला दान देण्यासाठी उत्सुक असतो कारण निसर्गात न संपणारा खजाना आहे. स्वाभाविकच निसर्ग कुणालाच निर्धन ठेवू शकत नाही. मूलतत्व सृजनाशी मैत्री करून सतत नवनव्या शक्यता, संधी, रूप आणि अवस्थांना जन्म देत असतात. निर्मिती साधनात तुटवडा जाणवला तर निसर्ग अधिक प्रमाणात त्याची निर्मिती करतो. शेत जमिनी जर पडित पडल्या असतील तर निसर्ग त्यांना अधिक कसदार करतो, सोनं, चांदी, जड-जवाहिर पृथ्वीच्या गर्भातून बाहेर काढल्या जावूं शकतं किंवा मूल तत्वापासून बनवल्या जावू शकतं. कारण मानवाच्या सर्व गरजांची परिपूर्ती करण्यासाठी मूलतत्व जबाबदार आहे. आणि हे मूलतत्व आपली जबाबदारी कधीच झटकून टाकीत नाही किंवा मानवाच्या गरजांच्या भस्मासुरापुढे हात टेकवून माघारही घेत नाही.

मुबलक प्रमाणात धनसंपत्ती मिळवणं हे आपलं कर्तव्य आणि अधिकार

आहे. आणि तरीही जर कुणी आपल्या दरिद्रियालाच कुरवाळीत बसला असेल, आपल्या गरीबीतच खूश होत असेल तर तो निसर्ग नियमांच्या विरोधात वर्तन करतो आहे. असेच आपणास म्हणावे लागेल.

विचार हा मूलतत्वाचाच केवळ एक अंश आहे कारण मूलतत्वात आकलन आणि विश्लेषणाची क्षमता असते हे मूलतत्वच माणसाला मुबलकतेच्या दिशेने प्रवास करण्यासाठी सातत्याने प्रेरित करीत असते.

मुबलकतेचा शोध, माहिती प्रचार आणि अमर्याद आत्मविष्कार हा जीवनाचा मूलधर्म आहे. या अभिव्यक्तीसाठी हे अमूर्त तत्व विश्वरूपी मूर्तरूप धारण करतं. आपली पृथ्वी हे त्याचं उत्तम उदाहरण होय. अनंतत्व हाच निसर्गाचा मूळ गुणधर्म आहे आणि त्यासाठीच त्याची रचना झाली आहे.

जीवनाच्या विस्तारासाठीच गरजेची असलेली सर्व साधन सामग्री निसर्गाद्वारे मानवापर्यंत पोचवली जाते आहे. ही त्या परमेश्वराचीच योजना आहे. ही योजना अशीच चालू ठेवण्याचा किंवा खंडित करण्याचा अधिकार ही इश्वराकडेच अबाधित आहे.

तुमच्या दारिद्रियाला निसर्ग किंवा निसगाचे विविध विशाल स्त्रोत कसे जबाबदार नाहीत, श्रीमंतीचे नेमके रहस्य काय आहे. हे पुढील प्रकरणातून मी स्पष्ट करू इच्छितो.

# मुबलकतेचा सिध्दांत

आपण एका अनंत विश्वात राहतो. ज्या लोकांचा पूर्ण विश्वास आहे त्यांना मुबलकते मधे कमतरता जाणवणार नाही, त्या सगळ्यासाठी इथे प्रचंड धन संपत्ती आहे. अभावामुळे कुणी इथे निर्धन नाही. म्हणजे तुम्हाला जे मिळवायची इच्छा असेल ते मिळू शकते. त्यासाठी दृढ इच्छा, ठाम निर्णय आणि प्रयत्नातले सातत्य मात्र हवे. तुम्ही श्रीमंत व्हाल की नाही हे मुबलकते बद्दल तुमच्या दृष्टीकोणावर अवलंबून असते.

मुबकतेच्या नियमानुसार जे ठाम निश्चय करतात त्यांना सधन बनवले जाते.

लोक श्रीमंत होतात कारण त्यांचा त्याच्या योग्यतेवर पूर्ण विश्वास असतो. ते योग्य दिशेने प्रयत्न करतात. आणि आपल्या स्वप्नांच्या पूर्ततिसाठी दिवसरात्र एक करतात.

मुबलकतेचा दुसऱ्या नियमाप्रमाणे जे लोक निर्णयच घेत नाही ते स्वत:च गरीब राहतात.

बॉब जिन लिखित रॅट रेस या पुस्तकात एक श्रीमंत म्हातारा त्याला श्रीमंत होण्याचे सूत्र विचारायला आलेल्या तरूणाला विचारातो की, ''तू आतांपर्यंत श्रीमंत का झाला नाही हे तुला ठाऊक आहे का ?''

जर हाच प्रश्न मी तुम्हाला विचारला तर तुम्ही काय उत्तर द्याल ? आजच्या काळात हाच प्रश्न स्वत:च्या बाबतीत बरेच काही जाणून घेण्याचा मार्ग झाला आहे.

माझा सल्ला असा की, या प्रश्नाचे उत्तर लिहितांना तुम्हाला श्रीमंत होण्यापासून रोखणाऱ्या कारणाची एक यादी तयार करा. तुम्हाला आश्चर्य वाटेल पण तुम्ही ती यादी तयार करू शकणार नाहीत आणि त्यासाठी तुम्ही

हजार कारणे सांगू शकाल. कारण या अडथळया विषयीच तुम्हाला प्रेम वाटू लागलेले असते. पण आता या सगळयापासून पिच्छा सोडवण्याची वेळ आली आहे. या जगात असे भरपूर लोक आहेत ज्यानी अनेक सघर्षांना तोंड देत देत समस्यांचा डोगंर पार केला आणि अभूत पूर्व यश मिळविले आहे.

इतकेच सांगायचे आहे की, नैराश्य झटकून यशासाठी तयार राहा. अत्यंत प्रामाणिक पणे अशा अडचणी शोधून काढा ज्याच्यामुळे तुम्ही आतांपर्यंत सधन होवू शकला नाही. आणि प्रत्येक चांगल्या-वाईट अनुभवातून शिकण्याचा प्रयत्न करा. पुढे चला, चालत राहा.

ब्रायन ट्रेसी

"बहुतांश लोक आतांपर्यत यामुळे श्रीमंत झाले नाहीत कारण त्यांनी आयुष्यभर आपल्या स्वतःच्या ध्येया पेक्षा इतरांच्याच ध्येयावर लक्ष्य ठेवून कार्य केले आहे."

जे पॉल गॅट्टी

# कार्यमुक्तीचा शोध

''कोणत्याही राष्ट्राच्या प्रगतीत त्या राष्ट्रातील आळशी लोक सर्वात मोठी बाधा असतात.''

आर. बुकमिंस्टर फुलर

कठीण मेहणत ही अशी गोष्ट आहे जी करण्यात लोकांना भिती वाटते. जे स्वतः बद्दल बोलताना थकत नाहीत, ''मला सोळा तास काम करायला आवडते.'' प्रगती करण्याच्या इच्छेने जास्त वेळ काम करण्यात काही वाईट नाही. फक्त तुम्हाला तुमच्या आरोग्याशी, परिवाराशी तुमच्या आनंदाशी आणि तुमच्या निद्रासुखाशी थोडी तडजोड करावी लागेल.

परंतु जेव्हां तुम्ही जगातले सर्वात श्रीमंत होवू इच्छिता तेव्हां तुमच्या या सोळा घंटे काम करण्याच्या मानसिकतेला जर दूर ठेवावे लागेल. कारण एक तास काम करुन तुम्हाला जितका फायदा होतो. त्यापेक्षा दोन तास काम केल्यावर निश्चितच दुप्पट फायदा होईल परंतु तुम्हाला अब्जावधी कमावायचे असतील तर त्यासाठी नव्या गणितांचा शोध घ्यावा लागेल.

कदाचित तुम्हाला माहित असेल की, यश हे कठीण परिश्रमाशी Inversely Proportional असते. अर्थात कठीण परिश्रमाची कपात झाली तर त्याच प्रमाणात यशाची मात्रा वाढते. म्हणजे याचा अर्थ असा की कष्टाची किंमत शून्य ठरवली तर अमर्याद यशापर्यंत पोहचता येवू शकते.

जगात कष्टकऱ्यांची संख्या कमी नाही परंतु त्यातील फारच कमी लोक सधन आहेत. म्हणजेच परिश्रमाशिवाय यश नाही असे पालूपद लावणारे लोक तुम्हाला फसवताहेत. त्यामुळे जर मोठे यश मिळवयाचे असेल तर स्वत:मधे काहीही न करण्याची योग्यता (Effortlessness) निर्माण करा. तरच खऱ्या अर्थाने तुम्ही यशस्वी होवू शकता.



तुम्ही कोणत्याही कारखान्याकडे पहा. जो जितके अधिक कष्ट करतो त्याला कमीत कमी वेतन दिल्या जाते. (हेल्पर इ.) अगदी या उलट कमी कष्ट करणाऱ्यांना अधिक वेतन दिले जाते. (निरीक्षक, व्यवस्थापक इ.) एखादया माणसाने शरीरबळाच्या आधारे विद्यूत निर्मिती करावयाचे ठरवले तर आयुष्यभर प्रयत्न करुन ही तो अधिकाधिक 4.30 डॉलर पेक्षा जास्त मूल्याची विद्यूत निर्माण करु शकणार नाही. अर्थात मी आता खात्रीशीर रित्या सांगू शकतो की कमीत कमी कठीण परिश्रम करुन अधिकाधिक यश मिळवता येवू शकते.


"प्रेरित करण्यासाठी आम्हाला अपयशाचे भय दाखवले जाते"

– फ्रेड ग्रटजोन

## *QFORD Best-Sellers*

# DARE TO FAIL / साहस विफलता का

(A book for those who hate to fail)




This book is dedicated to all the millions of people who have tried and failed in whatever they have attempted; to those who have still not achieved the things they want in life; to those who have climbed to great heights but have fallen; to the multitudes who have suffered greatly in their journey through life.

In a world where material achievement is being equated to ‘success’, many people give up, become very disappointed, some even commit suicide when they fail to get what they want.

What these people fail to know is that in the lives of all the world’s greatest achievers lie a path laden with many mistakes, set backs, disappointments and failures. But these stories are seldom told. Failing is considered Taboo!

Now for the 1st time in the world, a book has revealed it all - DARE TO FAIL. For too long we have listened to success stories, now let’s listen to the other side of the success story. Who then is the best person to share this inspiring message other than Mr. Billi Lim, the world’s first Failure Guru and No. 1 Best-selling author.

Billi, currently Asia’s top speaker, is a highly sought after motivational & inspirational speaker whose current speaking circuit covers Malaysia, India, Singapore, Brunei, Indonesia, Thailand, Vietnam, Philippines, Japan, Hong Kong, China, Taiwan, and USA.

Available in Hindi & English